# महाराष्ट्र विधानपरिषद

## तिसरे (पावसाळी) अधिवेशन, २०२४

---

**अतारांकित प्रश्नोत्तरांची यादी**

**प्रश्नांची एकूण संख्या - २०**

---

### वैतरणा (ता.मोखाडा, जि.पालघर) येथील नदीत शेकडो मासे मृतावस्थेत आढळून आल्याबाबत

**(१) १०७९० (२३-११-२०२१) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **मत्स्यव्यवसाय मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैतरणा (ता.मोखाडा, जि.पालघर) नदीपात्रात शेकडो मासे मृतावस्थेत पडल्याचे दिनांक २२ सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वैतरणा धरण परिसरात मासेमारीकरीता माशांवर विषप्रयोग झाल्यामुळे नदीतील शेकडो मासे मृत झाल्याची तक्रार ग्रामस्थांनी केली असून या घटनेमुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेला पाणीपुरवठा करणाऱ्या वैतरणा धरण परिसर सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी चौकशी करुन दोषींवर कारवाई करण्याची व वैतरणा धरण सुरक्षिततेच्या दृष्टीने उपाययोजना करण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थांनी शासनाकडे माहे सप्टेंबर, २०२१ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (०४-१२-२०२३) :** (१), (२), (३) व (४) वैतरणा (ता.मोखाडा, जि.पालघर) नदीत शेकडो मासे मृतावस्थेत पडल्याबाबत कोणतीही तक्रार वा निवेदन सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, ठाणे-पालघर या कार्यालयास प्राप्त नाही, तथापि, अशी घटना घडली आहे किंवा कसे

याबाबत सहायक आयुक्त मत्स्यव्यवसाय, ठाणे-पालघर यांनी दिनांक १३/१२/२०२१ च्या पत्रान्वये उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, तारापूर- १ यांना कळविले होते. उपप्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ तारापूर-१ यांचेकडून घटनेबाबत माहिती प्राप्त झालेली नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नैसर्गिक आपत्तीमुळे मृत पावलेल्या व्यक्तींना आर्थिक मदत देण्याबाबत

**(२) १२९७२ (३०-०३-२०२२) श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **आपत्ती व्यवस्थापन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हवामान खात्याने माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान गत वर्षभरात राज्यामध्ये अतिरिक्त पाऊस,गारपीट, वीज पडणे, पूर,अतिवृष्टी,दरड कोसळणे,आदी नैसर्गिक आपत्तींमुळे ३४० पेक्षा अधिक जणांचा मृत्यू झाल्याची आकडेवारी जाहीर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हवामान विभागाने जाहीर केलेल्या आकडेवारीनुसार नैसर्गिक आपत्तीमुळे मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबियांना शासनाने किती आर्थिक मदत दिली आहे,

(३) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अनिल पाटील (२७-०२-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

माहे जानेवारी, २०२२ मध्ये वा त्यादरम्यान गत वर्षभरात राज्यात अतिरिक्त पाऊस, गारपीट, विज पडणे, पूर, अतिवृष्टी, दरड कोसळणे, आदी नैसर्गिक आपत्तींमुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तींची विभागनिहाय आकडेवारी खालीलप्रमाणे आहे.

| महसुली विभाग | मृत पावलेल्या व्यक्तींची एकूण प्रकरणे | मृत पावलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत दिलेली प्रकरणे |
|---|---|---|
| कोकण | २०९ | १९७ |
| पुणे | ८९ | ७९ |
| छत्रपती संभाजीनगर | २०० | १८९ |
| अमरावती | १०६ | ९६ |
| नागपूर | १२५ | १२५ |
| नाशिक | ६९ | ६८ |
| एकूण | ७९८ | ७५४ |

उपरोक्तप्रमाणे नैसर्गिक आपत्तींमुळे मृत्यू पावलेल्या व्यक्तींच्या ७५४ कुटुंबीयांना शासन निर्णय, क्र.सीएलएस-२०१५/प्र.क्र.४०/म-३, दिनांक १३/०५/२०१५ मधील तरतुदीनुसार प्रत्येकी रुपये ४ लक्ष याप्रमाणे एकूण रुपये ३०१६.०० लक्ष इतकी आर्थिक मदत देण्यात आली असून उर्वरीत प्रकरणी कार्यवाही जिल्हा स्तरावरुन सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## रोहा (जि.रायगड) तालुक्यातील अवचितगड किल्ल्याची दुरावस्था झाल्याबाबत

**(३) १७९४९ (२५-०३-२०२३) श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **सांस्कृतिक कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रोहा (जि.रायगड) तालुक्यातील कुंडलिका नदीच्या तीरावर वसलेल्या व छत्रपती शिवाजी महाराजांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या अवचितगड किल्ल्याची दुरावस्था झाल्याचे माहे डिसेंबर, २०२२

मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शासनाच्या व पुरातत्व विभागाच्या दुर्लक्षामुळे गडावरील पायरी मार्ग नामशेष झाला असून तीन वर्षांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे गडाची तटबंदी कोसळून तटबंदीवर, सरजेवर झाडाझुडपांचे साम्राज्य पसरले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, स्थानिक पातळीवर शिव शंभू प्रतिष्ठान संस्था (ता.रोहा) अवचितगडावर गत आठ वर्षांपासून संवर्धन कार्य संवर्धनाचे सुरू असून पुरातत्व विभागाच्या निर्बंधांमुळे अवचितगडाच्या संवर्धन कार्यात अडथळा निर्माण होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवचितगड किल्ल्याच्या ऐतिहासिक वास्तुच्या संवर्धनासाठी कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.सुधीर मुनगंटीवार (२०-०२-२०२४) :** (१) प्रश्नाधीन किल्ला हा केंद्र संरक्षित किल्ला असून भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ या कार्यालयाच्या अखत्यारीत आहे. या किल्ल्याची दुरावस्था झाल्याची बाब भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ या कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही.
(२) अंशत: खरे आहे.
मागील दोन वर्षात झालेल्या अतिवृष्टी व चक्रीवादळामुळे सदर किल्ल्यावरील वास्तुंवर परिणाम होवून झाडाझुडपांची वाढ झालेली आहे. तथापि, भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ या कार्यालयामार्फत किल्ल्याची वेळोवेळी स्वच्छता करण्यात येते.
(३) अशी बाब भारतीय पुरातत्व सर्वेक्षण, मुंबई मंडळ या कार्यालयाच्या निदर्शनास आलेली नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## चंदगड (जि.कोल्हापूर) येथे काजू बोर्डाचे मुख्यालय स्थापन करणेबाबत

**(४) १९७४१ (०८-०८-२०२३) श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.राजेश राठोड, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले, डॉ.प्रज्ञा सातव, श्री.जयंत आसगावकर :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कोल्हापूर जिल्ह्यातील कोकणच्या सीमावर्ती भागातील चंदगड, आजरा, भुदरगड इत्यादी तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर काजू बियांचे उत्पादन होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, त्यामुळे काजू बोर्डाची स्थापना करुन चंदगड तालुक्यात त्याचे मुख्यालय स्थापन करावे असा प्रस्ताव कोल्हापूर जिल्हा प्रशासनाने शासनाकडे सादर केला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास,या बोर्डाचे मुख्यालय नवी मुंबईत आणि विभागीय कार्यालय रत्नागिरी, सिंधुदूर्ग जिल्ह्यात होणार आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, यासंदर्भात शासनाने माहिती व निर्णय घेऊन काजू बोर्डाचे मुख्यालय चंदगड (जि.कोल्हापूर) येथे स्थापन करणेबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०७-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) हे खरे नाही.
(३) पणन विभागाच्या दिनांक १६ मे, २०२३ च्या शासन निर्णयान्वये स्थापन केलेल्या "महाराष्ट्र राज्य काजू मंडळा"चे मुख्यालय वाशी, नवी मुंबई येथे तर रत्नागिरी व सिंधुदुर्ग येथे विभागीय कार्यालये स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली होती.
(४) पणन विभागाच्या दिनांक १३ ऑक्टोबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये काजू मंडळाचे विभागीय कार्यालय कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.

काजू उत्पादन क्षेत्राच्या मध्यवर्ती ठिकाणी काजू मंडळाचे मुख्यालय असणे आवश्यक असल्याने, दिनांक १ मार्च, २०२४ रोजीच्या शासन निर्णयान्वये काजू मंडळाचे मुख्यालय वाशी, नवी मुंबई ऐवजी "प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, वेंगुर्ला, जि.सिंधुदुर्ग येथे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## सातारा जिल्ह्यातील कोरेगांव तालुका कृषी अधिकारी कार्यालयाची नवीन इमारत बांधण्याबाबत

**(५) २११५९ (०३-०१-२०२४) श्री.शशिकांत शिंदे, श्री.अरुण लाड :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) सातारा जिल्ह्यातील कोरेगाव तालुका कृषी अधिकारी कार्यालयाची इमारत दिनांक १९ एप्रिल, २०२० रोजी कोसळली असून सध्या हे कार्यालय शेती उत्पन्न बाजार समितीच्या इमारतीमध्ये भाडेतत्वावर सुरु आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुका कृषी अधिकारी कार्यालयासाठी नवीन इमारती बांधण्याबाबत शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनसुध्दा अद्यापही नवीन इमारतीच्या बांधकामास शासनाकडून मंजुरी मिळाली नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोरेगाव तालुका कृषी अधिकारी कार्यालयासाठी नवीन इमारत बांधण्याबाबत शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे ?
(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (१९-०३-२०२४) :** (१) अंशत: खरे आहे.

तालुका कृषी अधिकारी, कोरेगाव कार्यालयातील अभिलेख कक्षाची भिंत कोसळली असल्याने विभागीय कृषी सहसंचालक कोल्हापूर, विभाग, कोल्हापूर यांच्या दिनांक २५/०५/२०२१ च्या आदेशान्वये कृषी उत्पन्न बाजार समिती कोरेगाव येथील शेतकरी निवास इमारतीच्या पहिल्या मजल्यावर भाडेतत्त्वावर सुरु आहे.
(२), (३) व (४) तालुका कृषी अधिकारी, कोरेगाव यांनी तालुका कृषी अधिकारी कार्यालय इमारत दुरुस्तीचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करुन मिळणेबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग, कोरेगाव जि.सातारा यांना कळविले आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अभिप्रायानुसार तालुका कृषी अधिकारी, कोरेगाव

कार्यालयाच्या इमारत दुरुस्तीबाबत अथवा नवीन इमारत बांधकामाबाबत आवश्यक ती नियमोचित कार्यवाही करण्यात येईल.

---

## शरणापुर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथे ५०० ईएसआयसी खाटांचे रुग्णालय उभारणेबाबत

**(६) २१२४८ (०५-०१-२०२४) श्री.सतिश चव्हाण, श्री.विक्रम काळे, श्री.अमोल मिटकरी :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शरणापुर (जि.छत्रपती संभाजीनगर) येथे राज्य कर्मचारी विमा महामंडळाचे ५०० खाटांचे रुग्णालय उभारण्याचा शासनाने निर्णय घेतला असून सदर रुग्णालयामुळे वाळुज, रेल्वे स्टेशन, शेंद्रा, चिकलठाणा येथील औद्योगिक वसाहतीतील किमान ५ लाख कामगार व त्याच्या कुटुंबातील किमान १० लाख व्यक्तींना आरोग्य सुविधा मिळणार आहेत, हे खरे आहे काय,

(२)असल्यास, सदर रुग्णालय उभारण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१३-०५-२०२४) :** (१) अंशत: होय,

मा.मंत्री, श्रम व रोजगार, भरत सरकार तथा अध्यक्ष, राकावि महामंडळ यांनी वाळूंज येथे २०० खाटांचे आणि शेंद्रा येथे ३० खाटांचे (१०० खाटांचे अपग्रेड करण्यायोग्य) राकावि रुग्णालय उभारण्यासाठी तत्त्वत: मान्यता दिली असून सदर रुग्णालये उभारण्यात आल्यानंतर त्या क्षेत्रातील विमाधारक व त्यांच्या कुटुंबियांसाठी वैद्यकीय सुविधा मिळणार आहे.

(२) शेंद्रा व वाळूज येथे नव्याने मंजूर झालेल्या रुग्णालयांच्या उभारणीसाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरु आहे. वाळूंज येथील जिल्हाधिकाऱ्यांनी देऊ केलेली जमीन आणि शेंद्रा येथील महाराष्ट्र इंडस्ट्रियल टाऊनशिप लि. ने देऊ केलेली जमीन राकावि रुग्णालयाच्या उभारणीसाठी योग्य असून, संबंधित अधिकाऱ्यांना सदर जमीन राकावि महामंडळास उपलब्ध करुन देण्याची विनंती राकावि महामंडळाकडून करण्यात आली आहे.

(३) शेंद्रा व वाळूंज येथे नव्याने मंजूर झालेल्या रुग्णालयांच्या उभारणीसाठी भूसंपादनाची प्रक्रिया सुरु असल्यामुळे विलंबाचा प्रश्न उभ्दवत नाही.

---

## जत (जि.सांगली) तालुक्याच्या त्रिविभाजनाबाबत

**(७) २१३६५ (०३-०१-२०२४) श्री.गोपिचंद पडळकर, श्री.प्रवीण दटके :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जत (जि.सांगली) तालुका हा सर्वाधिक विस्तार क्षेत्रफळ असलेला दुष्काळी तालुका असून तालुक्याच्या त्रिविभाजनाची मागणी अनेक वर्षापासून प्रलंबित आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनतेने यासाठी वारंवार आंदोलने, उपोषण, रस्ता रोको, बहिष्कार यासारखे मार्ग अवलंबले असून लोकप्रतिनिधींनी पावसाळी अधिवेशन २०२३ मध्ये देखील त्रिविभाजनाची मागणी शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रलंबित मागणीच्या अनुषंगाने शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०३-२०२४) :** (१) होय.
(२) जत तालुक्याचे विभाजन व्हावे यासाठी वेगवेगळ्या राजकीय पक्षांनी व संघटनांनी वेळोवेळी आंदोलने केलेली आहेत. तसेच, सन २०२३ च्या पावसाळी अधिवेशनात पुरवणी मागणीवरील चर्चेवेळी 'जत तालुक्याचे जत, संख व उमदी असे त्रिविभाजन करावे' असा मुद्दा सन्मानीय विधान परिषद सदस्य यानी उपस्थित केला होता.
(३) महसूल व वन विभाग, शासन परिपत्रक दिनांक ०२/०३/२०२३ अन्वये राज्यातील तालुक्यांच्या विभाजनांच्या अनुषंगाने सुधारित निकष निश्चित करण्याकरीता विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांच्या अध्यक्षतेखाली तालुका पुनर्रचना समिती गठीत करण्यात आलेली आहे. सदर समितीचा अहवाल प्रतिक्षेत आहे.

नवीन तालुका निर्मिती प्रशासकीय प्रक्रिया आहे. त्याकरीता आर्थिक भार असून त्याअनुषंगाने विविध पैलू तपासून त्यासंदर्भात मंत्रीमंडळाच्या मान्यतेने धोरण निश्चित झाल्यानंतर प्रकरणपरत्वे नवीन तालुका निर्मिती संदर्भात उचित निर्णय घेण्याचे संकल्पित आहे.

तत्पुर्वी, सांगली जिल्ह्यातील जत तालुक्याची वाढणारी लोकसंख्या, मोठे क्षेत्रफळ, झालेले नागरीकरण, दुष्काळग्रस्त भाग इ.बाबींमुळे जत तालुक्यातील तहसिल कार्यालयावर कामाचा मोठा ताण पडत असल्यामुळे प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने सांगली जिल्ह्यातील जत तालुक्यातील संख येथे दिनांक १०/०८/२०१७ च्या शासन निर्णयान्वये स्वतंत्र अपर तहसिल कार्यालयाची स्थापना करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खाजगी बाजार समित्यांचे मूल्यमापन करण्याबाबत

**(८) २१४०८ (०५-०१-२०२४) श्री.राजेश राठोड, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अभिजित वंजारी, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, डॉ.प्रज्ञा सातव :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या एकाधिकारातून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून खाजगी बाजार समित्या सुरु करण्यात आल्या आहेत, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, खाजगी बाजार समित्यांतून शेतकऱ्यांना फारसा फायदा होताना दिसत नाही, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने निर्णय घेऊन या खाजगी बाजार समित्यांचे मूल्यमापन करणेबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०७-०५-२०२४) :** (१) पणन व्यवस्थेत बदल करणेसाठी सन २००५ मध्ये शेतकऱ्यांना पर्यायी बाजार व्यवस्था उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खाजगी बाजार स्थापन करण्यासाठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार सध्या राज्यात एकूण ८४ खाजगी बाजार स्थापन करण्यात आले आहेत.
(२) प्रचलित बाजार व्यवस्थेस पर्यायी व्यवस्था म्हणून खाजगी बाजारांची निर्मिती होवून देखील यामध्ये

अपेक्षित स्पर्धा निर्माण झालेली नसल्याने त्याचा शेतकऱ्यांना फारसा फायदा झाला नसल्याचे प्रथमदर्शनी निदर्शनास आले आहे.
(३) राज्यामध्ये पर्यायी बाजार व्यवस्था निर्माण होऊन देखील प्रचलित बाजार व्यवस्था व नविन पर्यायी बाजार व्यवस्था यामध्ये खऱ्या अर्थाने स्पर्धा निर्माण होऊन शेतकऱ्यांना अधिकचा बाजार भाव मिळण्यासाठी राज्यातील सर्व खाजगी बाजार आवार, थेट पणन, शेतकरी ग्राहक बाजार व कृषी उत्पन्न बाजार समिती इ.घटकांचा अभ्यास करण्यासाठी पणन विभागाच्या दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ च्या शासन निर्णयान्वये सेवानिवृत्त सनदी अधिकारी श्री.उमाकांत दांगट यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास गटाची स्थापना करण्यात आली होती. सदर अभ्यास गटाने त्यांचा अहवाल शासनास नुकताच सादर केला आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यात राष्ट्रीय हरित प्राधिकरणाच्या धोरणामुळे विटभट्टीधारकांची व त्यांच्यावर उदरनिर्वाह करणाऱ्यांचे नुकसान होत असल्याबाबत

**(९) २१५०५ (०३-०१-२०२४) श्री.विप्लव बाजोरिया :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्यात राष्ट्रीय हरित प्राधिकरणाच्या धोरणामुळे विटभट्टीधारकांची व त्यांच्यावर उदरनिर्वाह करण्याकरीता अवलंबून असलेल्यांचे नुकसान होत असून मा.राष्ट्रीय हरित प्राधिकरण, पुणे यांच्याकडील प्रकरण क्र.३६/२०२१ मध्ये निर्णय देवून तात्पुरते गौणखनीज उत्खनन करण्यास प्रतिबंध करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महसूल व वन विभाग, मंत्रालय मुंबई यांनी शासन निर्णय क्र. भुखनि/१०/१०२/प्र.क्र.२९२/ख-२ दिनांक १३/१०/२०२२ नुसार लाईनर प्रोजेक्ट करण्याकरीता उत्खनन करण्याची परवानगी देण्यात आली असून विटभट्टीधारक यांना उदारनिर्वाह करण्यासाठी माती उत्खनन परवानगी देण्यासाठी कोणतीही तरतुद करण्यात आली नसल्यामुळे विटभट्टीधारक व त्यांच्यावर अवलंबुन असलेल्या व्यक्तींच्या उदरनिर्वाहाचा प्रश्न निर्माण झाला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, यापुर्वी तहसिल स्तरावरून माती उत्खननाची परवानगी स्वामित्वधनाची रक्कम भरणा करून देण्यात येत होती, परंतु मा.हरित लवादाच्या निर्णयानंतर या परवानग्या देणे बंद झाले आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, वीट व्यवसायिक थर्मल प्लान्ट मधून निघणाऱ्या राखेचा व मातीचा उपयोग करून विटा बनवित असतात त्यामुळे थर्मल प्लान्ट मधून निघालेल्या वेस्टचा रिसायकलीन करून निर्सगाचा कोणताही नाश होत नाही तसेच पर्यावरणामध्ये थर्मल प्लान्टची सामील होणारी राख याची विल्हेवाट लावावी लागते, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, विटभट्टीवरील कामगार व विटभट्टीधारक यांना माती उत्खनानाची परवानगी देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१३-०३-२०२४) :** (१),(२),(३),(४),(५) व (६) मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, खंडपीठ पुणे येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ३६/२०२१(WZ) मध्ये दिनांक ०३/०२/२०२२ रोजी दिलेल्या आदेशात गौण खनिजावरील तात्पुरते/अल्प मुदतीचे परवान्याकरीता सुध्दा पर्यावरण अनुमती आवश्यक असल्याचे नमूद केले होते. सदर आदेश शासनास प्राप्त होण्यापूर्वी मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, खंडपीठ पुणे येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ६८/२०२०(WZ) मध्ये दिनांक १७/०२/२०२२ रोजी दिलेले आदेश विभागास प्राप्त झाले. त्यामुळे मा.न्यायाधिकरणाचे दिनांक १७/०२/२०२२ रोजीच्या आदेशाची तात्पुरते परवाने देताना अवहेलना होणार नाही, याची दक्षता घेण्याच्या सूचना क्षेत्रिय यंत्रणेस विभागाने दिनांक २४/०३/२०२२ च्या पत्रान्वये देण्यात आल्या होत्या. त्यानुसार महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ५९ अन्वये अल्प/तात्पुरते परवाने देणे क्षेत्रिय यंत्रणेकडून बंद करण्यात आले होते.

तदनंतर, मा.राष्ट्रीय हरित न्यायाधिकरण, खंडपीठ पुणे यांनी मूळ अर्ज क्रमांक ६८/२०२२(WZ) मध्ये दिनांक १७/०२/२०२२ चे आदेश विभागाने मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे अव्हानित करण्यात आले असता, मा.सर्वोच्च न्यायालयाने दिनांक १४/१०/२०२२ च्या आदेशान्वये मा.न्यायाधिकरणाचे दिनांक १७/०२/२०२२ रोजीच्या आदेशास पुढील आदेशापर्यंत स्थगिती दिली आहे.

त्यानुषंगाने विभागाने मा.सर्वोच्च न्यायालयाचे आदेश विचारात घेवून दिनांक २०/१०/२०२२ च्या पत्रान्वये संबंधित सर्व शासकीय विभागांनी गौण खनिज उत्खननाबाबतचे अल्प/तात्पुरते परवाने देण्याची कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या. त्यानुषंगाने सद्य:स्थितीत पुन्हा क्षेत्रिय यंत्रणेकडून विटभट्टी करीता माती उत्खनन करण्याची महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३ च्या नियम ५९ अन्वये अल्प/तात्पुरते परवाने संबंधित उपविभागीय अधिकारी व तहसिलदार यांच्याकडून देण्यात येत आहेत.

कोळशावर आधारीत औष्णिक विद्युत प्रकल्पामधुन निघणाऱ्या राखेची बांधकाम क्षेत्रामध्ये विविध प्रकारच्या उत्पादनासाठी वापरली जाते व त्या राखेचा बांधकाम क्षेत्रातील उद्योगासाठी (जसे लाल मातीच्या विटा, राखेच्या विटा,ब्लॉक, पेपर ब्लॉक, टाईल्स व महामार्गाची कामे, इत्यादी) वापर करून राखेची योग्य ती विल्हेवाट लावली जाते. पर्यायाने पर्यावरणाची हानी टाळण्यास मदत होते.

---

## मुरबाड आणि माळशेज (जि.ठाणे) घाटालगतच्या आदिवासींची रोजगाराअभावी उपासमार होत असल्याबाबत

**(१०) २१९२८ (०३-०१-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **आदिवासी विकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुरबाड आणि माळशेज (जि.ठाणे) घाटा लगतच्या ३३ आदिवासी वाड्यांवरील आदिवासी पावसाळ्यात घाट माथ्यावर रानभाज्या विकून उदर निर्वाह करत असून आदिवासी वस्त्यांवरील वाढती बेरोजगारी, दारिद्रयांचा व कुपोषणाचा समस्या भेडसावत असल्याने खावटी वाटप योजना सुरू करण्याची मागणी आदिवासी समाजाने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन खावटी अनुदान योजनेंतर्गत दोन वर्षांपूर्वी आदिवासी कुटूंबांना खावटी अनुदानांतर्गत दोन हजार रोख व दोन हजार रुपयांचे वस्तूरूपाने लाभ देण्यात आला होता, परंतु मागील दोन

वर्षात या आदिवासी वर्गाला हे लाभ मिळत नसल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, खावटी योजनेंतर्गत आदिवासींना अनुदान न मिळण्याची कारणे काय आहेत,
(४) असल्यास, उपरोक्त प्रकरणी आदिवासींना अनुदान देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेनसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. विजयकुमार गावीत (२७-०२-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.
(३) व (४) आदिवासी लाभार्थ्यांकरीता खावटी कर्ज योजना सुरु करण्याकरीता प्रस्ताव प्राप्त झाला असून सदर प्रस्तावावर शासनस्तरावर कार्यवाही सुरू आहे.

---

## आखाडा बाळापूर तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयात वैद्यकीय अधिकारी नसल्याने रुग्णांची गैरसोय होत असल्याबाबत

**(११) २१९४३ (०५-०१-२०२४) डॉ.प्रज्ञा सातव, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.वजाहत मिर्झा, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) आखाडा बाळापूर तालुक्यातील ग्रामीण भागात साथीचे आजार पसरले असून डेंग्यु, मलेरिया या साथीच्या रोगामुळे ग्रामीण रुग्णालयात दररोज ४०० ते ५०० रुग्ण उपचारासाठी येत असून डॉक्टर नसल्याने रुग्णांची प्रचंड गैरसाय होत असल्याची बाब माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी नसल्याने एका प्रभारी अधीक्षक आणि वैद्यकीय अधिकारी यांना जास्त प्रमाणात काम करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने याबाबत आढावा घेऊन आखाडा बाळापूर (जि.नांदेड) तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील रिक्त पदे भरुन या भागातील रुग्णांची होणारी गैरसोय दूर करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. तानाजी सावंत (१४-०५-२०२४) :** (१) व (२) आखाडा बाळापूर तालुक्यातील (जि.नांदेड) ग्रामीण रूग्णालयात वैद्यकीय अधिकाऱ्यांची ३ पदे मंजूर असून त्यावर १ नियमित वैद्यकीय अधिकारी व २ बंधपत्रित वैद्यकीय अधिकारी कार्यरत आहेत. दिनांक १९/१०/२०२३ रोजी सदर रूग्णलयात प्रभारी वैद्यकीय अधीक्षक रूजू झाले आहेत. सदर वैद्यकीय अधिकाऱ्यांमार्फत चांगल्या प्रकारे रूग्णसेवा दिली जात आहे.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## मौ.पिंपळगांव बसवंत,ता.निफाड, जि.नाशिक येथील देवस्थानाची जमीन कुळ कायद्याचे उल्लंघन करुन बेकायदेशीररित्या विक्री केल्याबाबत

**(१२) २१९५२ (०४-०१-२०२४) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे पिंपळगाव बसवंत, (ता.निफाड, जि.नाशिक) येथील सर्व्हे नं.१३६ / ३/ क/ १३६/ई या जमिनीचे श्री.लक्ष्मीनारायण देवस्थान यांच्या नावे सन १९३५ पासून दाखल होते, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर नोंदणीकृत ट्रस्टच्या नावे असलेल्या सदर मिळकतीला श्री.खंडू भाऊ विधाते कुळ म्हणून दाखल झाले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर जमिनीचे कुळ कायद्याची जमीन विक्री करीत असताना जिल्हाधिकारी व धर्मदाय आयुक्त व इतर संबंधितांची कोणतीही पूर्वपरवानगी घेतली गेली नाही, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, देवस्थानाच्यावतीने वहिवाट म्हणून दाखल असलेल्या व्यक्तींना अंधारात ठेऊन कुळ असल्याचा बोगस दावा करणाऱ्या व्यक्तींच्या नावे सदर मिळकत करण्यात आली, हे ही खरे आहे काय,
(५) असल्यास, श्री लक्ष्मीनारायण देवस्थान यांच्या जमिनीची बेकायदेशीर विक्री झाल्याचे निदर्शनास येऊनही कोणतीही कार्यवाही केली नाही, हे ही खरे आहे काय,
(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (१२-०३-२०२४) :** (१), (२), (३), (४) व (५) हो. हे खरे आहे.

सन १९३१ गट नं. १३६/३ ब चा ७/१२ उतारा पाहता श्री.लक्ष्मीनारायण देव तर्फे श्री.भिका भाऊ शेट, श्री.रंगनाथ एकनाथ, श्री.अनंत महादेव, श्री.कोंडाजी गोविंद पुंजा नामदेव यांचे नावे असल्याचे दिसुन येत आहे. सन १९३१ गट नं. १३६/३ क चा ७/१२ उतारा पाहता श्री.लक्ष्मीनारायण देवाचे वहिवाटदार श्री.पंच भिका तुकाराम, श्री.रामा गोपाळ शिंपी, श्री.केशव गोपाळ, श्री.दत्तु तुकाराम यांचे नावे असल्याचे दिसून येत आहे.

तसेच, नोंद नं. ४६९२ अन्वये ३२ एम. सर्टिफिकेट नुसार श्री.शिवराम बापू विधाते व श्री.खंडु बापू विधाते यांचे नाव दाखल झालेले आहे.

तसेच, जमिनीची कुळ कायद्याची विक्री करीत असताना मा.जिल्हाधिकारी व धर्मदाय आयुक्त व इतर यांची पूर्व परवानगी घेतलेली नाही.

तसेच, तहसिल कार्यालय निफाड यांचे कडील केस क्र. २२६/१९६७ दिनांक २०/११/१९६७ अन्वये कुळ श्री.शिवराम भाऊ विधाते विरुध्द लक्ष्मी नारायण देवाचे वहिवाटदार व इतर यांना तत्कालीन तहसीदार निफाड यांनी सुनावणी घेवून निकाल पारित केल्याचे दिसते. सदर केसेसच्या निकालानुसार श्री.शिवराम बापु विधाते व श्री.खंडू बापु विधाते यांना ३२- एम प्रमाणपत्र देण्यात आलेले आहेत.

तसेच, तहसिलदार निफाड यांचे कडेस क्र. कुका/केस क्र. १७/२०१८ दिनांक ३०/०६/२०२२ अन्वये श्री.नामदेव शिंपी समाज श्री.लक्ष्मी नारायण मंदिर देवस्थान ट्रस्ट तर्फे श्री.कांतीलाल मधुकर भडांगे विरुध्द कै. श्री.खंडू भाऊ विधाते अन्वये अपिलार्थी यांचा अर्ज फेटाळण्यात आलेले आहे.

तहसिलदार निफाड यांचेकडील दिनांक ३०/०६/२०२२ रोजीच्या निकालाविरुध्द अपिलार्थी यांनी उपविभागीय अधिकारी निफाड उपविभाग यांचे न्यायालयात टेनन्सी / अपिल / क्र.५३४ / २०२२ अन्वये

अपिल दाखल केलेले आहे. सदर अपिल अर्जावर जिल्हाधिकारी, नाशिक कार्यालयामार्फत सद्य:स्थितीत सुनावणी सुरु आहे.
(६) प्रश्न उद्भवत नाही.

---

## नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेने कर्मवीर भाऊराव पाटील साकोरा महाविद्यालयाची जमा असलेली रक्कम देण्याबाबत

**(१३) २२००७ (०४-०१-२०२४) प्रा.राम शिंदे, श्री.प्रविण दरेकर, श्री.रमेशदादा पाटील, श्रीमती उमा खापरे, श्री.निलय नाईक, श्री.रामदास आंबटकर, श्री.विजय ऊर्फ भाई गिरकर, श्री.रमेश कराड :** सन्माननीय **सहकार मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या नांदगाव शाखेत रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील साकोरा महाविद्यालयाचे लाखो रुपये बँकेत जमा असतानाही ती रक्कम मध्यवर्ती बँकेकडून विद्यालयाला देण्यात येत नसल्याने या शाळेतील विद्यार्थी आणि शिक्षकांनी बँकेच्या नांदगाव शाखेत शाळा भरवत अनोखे आंदोलन केले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, रयत शिक्षण संस्थेच्या कर्मवीर भाऊराव पाटील साकोरा महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांसाठी पुरेशी जागा नसल्याने शाळेचे बांधकाम प्रलंबित आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, नाशिक जिल्हा मध्यवर्ती बँकेने कर्मवीर भाऊराव पाटील साकोरा महाविद्यालयाची जमा असलेली रक्कम परत करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.दिलीप वळसे-पाटील (०४-०३-२०२४) :** (१) व (२) हे खरे आहे.
(३) सन २०१७ मध्ये पुरेशा निधी अभावी नाशिक जिल्हा मध्यवर्ती सहकारी बॅकेचे क्लियरिंग बंद करण्यात आले आहे. तेव्हापासून कोणत्याही खातेदारास त्याच्या मागणी प्रमाणे एकरकमी ठेव रक्कम परत करता आलेली नाही. बॅकेने दिलेल्या कर्जाची वसुली प्रभावीपणे होत नसल्याने बॅकेस अपुऱ्या निधीचा सामना करावा लागत आहे.
बॅकेत कर्मवीर भाऊराव पाटील साकोरा महाविद्यालयाची रुपये ११.०९ लाख इतकी बचत रककम शिल्लक होती. त्यापैकी बॅकेने ठेव वाटप धोरणाच्या नियमावलीनुसार रुपये ३.०० लाख इतकी रक्कम अदा केली आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना सन २०२२-२३ मधील आंबा फळपीक विम्याची रक्कम अदा करण्याबाबत

**(१४) २२१५८ (०३-०१-२०२४) श्री.विलास पोतनीस, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अवकाळी पावसामुळे पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या आंबा पिकाचे नुकसान झाले असताना सदर पीक विमाधारक शेतकऱ्यांना सन २०२२-२३ मधील आंबा फळपीक विम्याची रक्कम अद्यापही मिळाली नसल्याची बाब दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी पालघर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आंबा फळपीक विम्याची रक्कम अदा करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.धनंजय मुंडे (११-०३-२०२४) :** (१) हे खरे नाही.

(२) पालघर जिल्ह्यातील आंबिया बहार सन २०२२-२३ मधील ३,३९४ शेतकऱ्यांनी आंबा फळपीक विमा योजनेमध्ये सहभाग घेतला आहे व त्यापैकी २,९४२ नुकसानपात्र शेतकऱ्यांपैकी २,९३१ शेतकऱ्यांना रक्कम १४.७१ कोटी रुपयाचे वाटप झाले असून उर्वरित रक्कम अदा करण्याची कार्यवाही चालू आहे.
(३) प्रश्न उद्भवत नाही.

---

## मालवण (जि.सिंधुदूर्ग) किनारपट्टी भागातील मोरयाचा धोंडा या प्रसिध्द स्थळाला धार्मिक पर्यटन स्थळाचा दर्जा देण्याबाबत

**(१५) २२२५४ (०५-०१-२०२४) श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालवण (जि.सिंधुदूर्ग) किनारपट्टी भागातील मोरयाचा धोंडा या नावाने प्रसिध्द असलेल्या सव्वा लाख लोकसंख्या असलेल्या गाबीत (मच्छिमार) समाजाचे श्रध्दास्थान असलेल्या स्थळाचा ऐतिहासिक वारसा व महत्त्व लक्षात घेता लाखो शिवप्रेमी व पर्यटक दरवर्षी भेट देत असतात, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरहू स्थळाला धार्मिक पर्यटन स्थळाचा दर्जा देवून धार्मिक पर्यटन स्थळांच्या यादीत त्याचा समावेश करण्याबाबत मा.लोकप्रतिनिधींनी माहे मार्च, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान मा.उप मुख्यमंत्री महोदयांना लेखी निवेदनाद्वारे विनंती केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू स्थळाला धार्मिक पर्यटन स्थळाचा दर्जा देवून धार्मिक पर्यटन स्थळांच्या यादीत त्याचा समावेश करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, याबाबतची कार्यवाही शासन किती कालावधीत करणार आहे
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०६-०५-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.

(२) नाही, हे खरे नाही.

(३) सदर तिर्थक्षेत्रास तिर्थक्षेत्र विकास कार्यक्रमांतर्गत ‘क’ वर्ग दर्जा देण्याबाबत ग्रामपंचायत, वायरी-भुतनाथ यांच्यामार्फत दिनांक ३०/०१/२०२४ रोजी जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना पत्र व्यवहार करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## राज्यातील खासगी बाजार समित्यांच्या कारभाराबाबत सेवानिवृत्त सनदी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन केलेल्या समितीबाबत

**(१६) २२४०१ (०५-०१-२०२४) श्री.प्रसाद लाड :** सन्माननीय **पणन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पणन कायद्यात सुधारणा करून केंद्र शासनाच्या सुचनेनुसार सुमारे ८८ खाजगी बाजार समित्यांना तसेच शेतकऱ्यांना शेतातून थेट शेतीमालाची खरेदी व चांगला भाव मिळावा व त्यातून शेतकऱ्यांना लाभ होण्यासाठी कृषी उत्पन्न बाजार समित्यांचा पर्याय उभा करण्याचा निर्णय तत्कालीन मुख्यमंत्री यांच्या काळात घेण्यात आला असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाच एकर जागा असलेल्या व्यक्तीला खाजगी कृषी उत्पन्न बाजारपेठ समितीच्या एक एकर जागेवर शेतकरी वर्ग ग्राहक बाजारपेठ सुरू करण्याचा परवाना देण्याचा निर्णय घेण्यात आला त्यानुसार सुमारे ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्यांपैकी शेतकऱ्यांकडून थेट शेतीचा माल खरेदी करण्याची परवानगी देण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, खाजगी कृषी उत्पन्न बाजार समित्या आणि कंपनीच्या व्यवसायात १० ते १५ हजार कोटींची उलाढाल होत असून या कृषी उत्पन्न बाजार समितीच्या एकाधिकारशाहीतून शेतकऱ्यांची सुटका करण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून सुरू करण्यात आलेल्या खाजगी कृषी उत्पन्न बाजार समित्यांकडून शेतकऱ्यांना फारसा फायदा होत नसल्याचे त्याच दरम्यान निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाच्या कृषी उत्पन्न बाजार समित्या अडचणीत सापडल्याने शेतकऱ्यांना समित्यांकडून फायदा होतो की नुकसान यासंदर्भात सर्व कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कारभाराची सखोल चौकशी करण्याचा निर्णय शासनाने घेऊन सेवानिवृत्त सनदी अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, उक्त समितीने शासनाला अहवाल सादर केला असल्यास सदर अहवालाचे निष्कर्ष काय आहेत, अहवालाच्या अनुषंगाने शासनाने कृषी उत्पन्न बाजार समित्यांच्या कारभाराची सखोल चौकशी करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अब्दुल सत्तार (०७-०५-२०२४) :** (१) हे खरे नाही.

पणन व्यवस्थेत बदल करणेसाठी सन २००५ मध्ये शेतकऱ्यांना पर्यायी बाजार व्यवस्था उपलब्ध होण्याच्या दृष्टीने खाजगी बाजार स्थापन करण्यासाठी परवाना देणे तसेच थेट खरेदी करता यावी यासाठी एकल बाजार परवाना देणे इ.साठी महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३ मध्ये सुधारणा करण्यात आलेली आहे.

त्यानुसार सध्या राज्यात एकूण ८४ खाजगी बाजार स्थापन करण्यात आले असून, १५०७ थेट पणन परवाने देण्यात आलेले आहेत.

(२) हे खरे नाही.

महानगरपालिका क्षेत्रासाठी सहा एकर व इतर भागामध्ये पाच एकर जागा असणाऱ्या व्यक्तींना खाजगी बाजार परवाना देण्याची महाराष्ट्र कृषी उत्पन्न पणन (विकास व विनियमन) अधिनियम, १९६३

खालील नियम, १९६७ मध्ये तरतूद आहे. परंतु, एक एकर जागेवर शेतकरी वर्ग ग्राहक बाजारपेठ सुरु करण्यासाठी आजतागायत एकही परवाना देण्यात आलेला नाही. तसेच ३०६ कृषी उत्पन्न बाजार समित्या खाजगी नाहीत.

(३) व (४) खाजगी बाजार स्थापन करण्याचा उद्देश पर्यायी बाजार व्यवस्था निर्माण होवून प्रचलित बाजार व्यवस्था व नवीन पर्यायी बाजार व्यवस्था यामध्ये खऱ्या अर्थाने स्पर्धा निर्माण करणे असा आहे. मात्र, तो उद्देश पूर्णपणे सफल झाला असे प्रथमदर्शनी दिसून येत नसल्याने, यासंदर्भात अभ्यास करुन अहवाल सादर करण्यासाठी सेवानिवृत्त सनदी अधिकारी श्री.उमाकांत दांगट यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयाव्दारे अभ्यास गटाची स्थापना करण्यात आलेली होती.

(५) राज्यातील खाजगी बाजार आवार संदर्भात अभ्यास करण्यासाठी दिनांक १३ सप्टेंबर, २०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये गठीत केलेल्या अभ्यासगटाने राज्यातील खाजगी बाजार आवार व कृषी उत्पन्न बाजार समित्यांना भेटी देऊन सविस्तर अहवाल तयार केला असून तो नुकताच शासनास सादर केला आहे.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

## राज्यातील तलाठ्यांना ग्रामपंचायत कार्यालयावर उपस्थितीचे फलक लावणे बंधनकारक असल्याबाबत

**(१७) २२४९० (०३-०१-२०२४) श्री.विक्रम काळे :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात पाच हजारांहून अधिक तलाठ्यांची पदे रिक्त असल्यामुळे एका तलाठ्याकडे एकापेक्षा जास्त सज्जांचा कार्यभार सोपविण्यात आला असून नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी सज्जाच्या ठिकाणी उपस्थित राहण्याबाबतचे वेळापत्रक तयार करुन ग्रामपंचायत व शासकीय इमारतीवर लावण्याचे आदेश शासनाने दिनांक २० ऑगस्ट, २०२३ रोजी वा त्यादरम्यान दिले असल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मौ. सांगरुण व मौ. मांडवी (जि.पुणे) या गावांसाठी तलाठी म्हणून नियुक्ती होऊनही एकदाही हजर झाले नसल्याने मौ.सांगरुण येथील नागरिकांना ४ कि.मी. व मौ.मांडवी येथील नागरिकांना १० कि.मी. अंतरावर असलेल्या मौ.शिवणे येथे राहणाऱ्या तलाठी यांचेकडे जावे लागत असल्याने मा.तहसिलदार, हवेली, मा.जिल्हाधिकारी, पुणे व मा.पालकमंत्री, पुणे जिल्हा यांचेकडे निवेदन सादर केले असल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उपरोक्त प्रकरणी सादर केलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.राधाकृष्ण विखे-पाटील (०७-०३-२०२४) :** (१) होय हे खरे आहे.

(२) अशी बाब नाही.महसूल व वन विभागाच्या शासन निर्णय दिनांक ०७ डिसेंबर, २०२२ अन्वये पुणे जिल्ह्यासाठी ३३१ नवनिर्माण तलाठी पदे निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. तसेच पुर्वीचा सांगरुण या मूळ साझाचे (सजातील गावे-मांडवी खुर्द, सांगरुण बहुली) फुटून नविन साझा सांगरुण, साझा मांडवी खुर्द व साझा बहुली असे तीन स्वतंत्र साझे निर्माण झालेले आहेत. सांगरुण या मूळ साझावर

उपविभागीय अधिकारी, हवेली यांनी दिनांक ३०/०६/२०२३ रोजीच्या आदेशान्वये श्रीमती प्रेरणा विनंदकुमार पारधी, तलाठी यांची नियुक्ती केली आहे. तसेच साझा मांडवी खुर्द व साझा बहुल यांचा अतिरिक्त कार्यभार श्रीमती प्रेरणा पारधी, तलाठी यांना तलाठी पदभरती प्रक्रिया पूर्ण होई पर्यंत देण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांचे बांधकाम पुर्ण करण्याबाबत

**(१८) २२५६२ (०५-०१-२०२४) श्री.राजहंस सिंह :** सन्माननीय **गृहनिर्माण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्य शासनाच्या महत्वकांक्षी बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पांतर्गत स्थानिक भाडेकरू तथा रहिवाशांच्या पात्रता निश्चिती प्रक्रियेविषयी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाचे उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी माहिती घेतली असून या कामास वेग येण्याकरीता संबंधित उपजिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा करून योग्य पाठपुरावा करावा असे निर्देश संबंधित अधिकाऱ्यांना दिले असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुंबईतील वरळी नायगाव, ना.म.जोशी मार्ग येथील बीडीडी चाळ, पुनर्विकास प्रकल्पास म्हाडाचे उपाध्यक्ष व सी.ई.ओ. यांनी भेट देऊन पहिल्या टप्प्यातील बांधकामाच्या प्रगतीचा आढावा घेवून बांधकाम त्वरित करण्याचे आदेश दिले आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बीडीडी चाळ पुनर्विकासाचे बांधकाम तातडीने करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे (३१-०५-२०२४) :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) बी.डी.डी. चाळींच्या तीनही पुनर्विकास प्रकल्पांच्या पहिल्या टप्प्यातील कामे सुरु झालेली असून, प्रगतीपथावर आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

---

## कोयना धरणाच्या शिवसागर जलाशयाच्या बॅकवॉटर परिसरात पर्यटन विकासाला चालना देण्याबाबत

**(१९) २२६७५ (०९-०१-२०२४) श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.रमेशदादा पाटील, श्री.प्रवीण दटके, श्री.निलय नाईक, प्रा.राम शिंदे, श्री.महादेव जानकर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोयना धरण किंवा शिवसागरच्या बॅकवॉटर परिसरात पर्यटन विकासाला चालना देण्यासाठी शासकीय गुपिते कायदा १९२३ मध्ये शासनाने अंशतः बदल केला असून या सुधारणामुळे धरण आणि आजूबाजूच्या सात किलोमीटर पर्यंतच्या क्षेत्राला प्रतिबंधित क्षेत्र म्हणून बाधित ठेवून उर्वरित जलाशयाचा ८० किलोमीटर

परिसराचा पर्यटनदृष्ट्या विकसित होणार असल्याने सातारा जिल्हा पर्यटनात मोठी वाढ होणार असल्याचे माहे ऑक्टोबर, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, जलाशयाचा विस्तीर्ण परिसर जल पर्यटनच्या दृष्टीने विकसित करण्यात येणार असून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातून जावळी तालुक्यातील मुनावळे येथे जागतिक दर्जाचे जल पर्यटन विकसित करण्याचे शासनाचे नियोजन असून त्यासाठी ४७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, कोयना धरण परिसरात जंगले, सह्याद्री डोंगररांगा, निळेशार पाणी असे निसर्गाचे वरदान लाभलेल्या शिवसागर जलाशयात जलपर्यटनामुळे स्थानिक युवकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होणार आहेत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे, नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (१८-०४-२०२४) :** (१) होय, हे खरे आहे.
(२) अंशत: खरे आहे.
मौजे मुनावळे, ता.जावळी, जि.सातारा येथे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत जागतिक दर्जाचे जल पर्यटन केंद्र विकसित करण्याच्या रुपये ४५.३८ कोटी रकमेच्या प्रस्तावास मान्यता देण्यात आली आहे.
(३) होय, हे खरे आहे.
(४) सदर जलपर्यटन केंद्राच्या माध्यामातून स्थानिक युवकांना रोजगार उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळामार्फत सुरु करण्यात आली आहे.

---

## मेळघाट परिसरातील आदिवासी बहुल भागातील जिल्हा परिषदेच्या शाळांमधील शिक्षक विनापरवानगी गैरहजर राहत असल्याबाबत

**(२०) २२७४८ (०५-०१-२०२४) श्री.अंबादास दानवे :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मेळघाट (जि.अमरावती) या आदिवासी बहुल भागामधील चुरणी, बोरदा, पिपल्या व टेंभ्रू येथील जिल्हा परिषदेच्या शाळेवर स्थानिक सरपंच व शाळा व्यवस्थापन समितीने भेट दिली असता भेटी दरम्यान शाळेत शिक्षक विनापरवानगी गैरहजर राहत असून काही शाळा शिक्षक नसल्याने बंद असल्याची बाब माहे ऑगस्ट, २०२३ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, आदिवासी भागातील मुलांना शिक्षण मिळण्याचे मुख्य साधन हे जिल्हा परिषदेच्या शाळा असून तेथील शिक्षक हे वारंवार विनापरवानगी गैरहजर राहत असल्याची तक्रार स्थानिक सामाजिक कार्यकर्ते यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली होती, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उपरोक्त गावांतील जिल्हा परिषदेच्या शाळांवर किती शिक्षकांची नियुक्ती करण्यात आली आहे, किती शिक्षकांची पदे रिक्त आहेत,

(४) असल्यास, शासनाने मेळघाट जिल्ह्यातील आदिवासी बहुल भागातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच विनापरवानगी गैरहजर राहणाऱ्या शिक्षकांवर कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.गिरीश महाजन (०८-०५-२०२४) :** (१) व (२) अंशत: खरे आहे.
(३) नमूद जि.प. शाळांवर पुढीलप्रमाणे शिक्षक नियुक्त, कार्यरत व रिक्त आहेत.

| जि.प.शाळा | मंजूर | कार्यरत | रिक्त |
|---|---|---|---|
| चुर्णी | ७ | ४ | ३ |
| बोरदा | २ | १ | १ |
| पिपल्या | २ | १ | १ |
| टेंभ्रु | २ | २ | ० |

(४) स्थानिक सरपंच व सामाजिक संस्था यांनी दिनांक ०८/०८/२०२३ रोजी जिल्हा परिषद, शाळा चुर्णी, बोरदा, पिपल्या व टेंभ्रु येथे भेट दिली असता,
(अ) जि.प. शाळा चुर्णी येथील कार्यरत सर्व शिक्षक शाळेवर हजर होते.
(ब) जि.प. शाळा बोरदा या ठिकाणी सदर शाळेवरील शिक्षक दुपारी ०२.०० वा. हजर झाल्याची बाब निदर्शनास आली.
(क) जि.प.शाळा पिपल्या या ठिकाणी शिक्षक गैरहजर असल्याची बाब निदर्शनास आली.
(ड) जि.प.शाळा टेंभ्रु या ठिकाणी एक शिक्षक अधिकृतपणे किरकोळ रजेवर होते. तर दुसरे शिक्षक विद्यार्थ्यांना वर्गात उपस्थित ठेवण्याकरीता गावात व शेतात गेल्याने सदर दिवशी शाळा एक तास उशिरा उघडण्यात आल्याची बाब निदर्शनास आली.

सबब, शिक्षण विभाग, चिखलदरा पंचायत समिती यांनी दिनांक २५/०९/२०२३ च्या आदेशान्वये शिक्षकांना गैरहजरी व उशीरा शाळा उघडण्यासंदर्भात कारणे दाखवा नोटीस बजावून एक दिवसाचे विनावेतन रजा करण्यात येवून सक्त ताकिद देण्यात आलेली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

---

**विधान भवन :**
**मुंबई.**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानपरिषद.**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.